# बौद्ध तत्त्वज्ञानासक्त सम्राट अशोक



**अशोक तपासे**

चैत्र शुद्ध अष्टमी बुद्धाब्द २५६२
शनीवार , १३ एप्रिल २०१९

पुरिस-दम्म प्रकाशन

संपर्क भ्रमणध्वनी

९९३०११२११३

९८६९११२११३

८८७९११२११३

: मुखपृष्ठ :

सारनाथ येथे मिळालेल्या अशोक स्तंभाच्या अवशेषांचे सन १९०५ मधे माधो प्रसाद यांनी बनारसच्या महाराजांसाठी काढलेले छायाचित्र. सध्या हे छायाचित्र ब्रिटीश लायब्ररी, लंडन येथे आहे.

# बौद्ध तत्वज्ञानासक्त सम्राट अशोक

इसवीसन पुर्व सुमारे पाचशे वर्षांपुर्वी भारतात बौद्ध तत्वज्ञानाचा उदय झाला. बुद्धांने उपदेशिलेल्या विचारांना "बौद्ध धर्म" म्हणण्या पेक्षा बौद्ध जीवन तत्वज्ञान म्हणणे अधिक संयुक्तिक होईल. कारण बुद्धाचे हे तत्वज्ञान, संप्रदाय उदयापासून आज पर्यंत धर्म या संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या विचार प्रवाहांपेक्षा मुलतः वेगळे आहे. बुद्धाने मांडलेली विचारधारा ही तथाकथित धर्मातील मुलभुत संकल्पनेलाच छेद देवून पुढे जाते. बुद्धांच्या या विचारधारेला शिरसावंद्य मानणारे कांही भारतीय म्हणतात बुद्धाच्या या तत्वज्ञानास धर्म नव्हे तर धम्म म्हणावे. कारण बुद्धाच्या या तत्वज्ञानास प्राकृत किंवा पालि भाषेत धम्म म्हटले आहे. भारतातील प्राचिन भाषांच्या अभ्यासाच्या अभावामुळे हे असे वक्तव्य केले जात असावे. प्राकृत भाषांमधे ज्याला धम्म म्हणून संबोधले आहे त्यालाच संस्कृत आणि इतर आधुनिक भारतीय भाषांमधे धर्म म्हटले आहे. म्हणुनच धर्म आणि धम्म हे एकाच अर्थाचे दोन शब्द आहेत. धर्म या शब्दाला इंग्लिश मधे Religion म्हटले जाते. पदार्थाचा धर्म म्हणजे त्याच्यात असलेला असा गुण की ज्यामुळे तो पदार्थ स्पष्टपणे ओळखता येतो. याला इंग्लिश मधे Quality/Property म्हणतात. इतर जीवांचा धर्म म्हणजे त्या जीवांचा सामान्य जगण्यातील स्थायीभाव, म्हणजेच Character. असे म्हटले जाते की, डंख मारणे हा विंचवाचा धर्म आहे. त्याच न्यायाने धर्म म्हणजे मानवाच्या जगण्याच्या स्थायीभावाची रीत. पण आता, तत्कालीन वा सार्वकालीन धर्म ही संकल्पना मात्र अनेक संप्रदायांनी एकसमान पद्धतीने, मुलतः धर्म संकल्पनेहून वेगळी केली आहे. सृष्टीच्या सृजनापासुन तर मानवाच्या कल्याणा पर्यंत प्रत्येक टप्प्यावर कोण्या एका अमुर्त शक्तिच्या उपासनेच्या मार्गानेच सर्वकांही सुलभ साध्य होते, हेच सांगणारे सर्व संप्रदाय आणि सर्व विचार प्रवाह तेंव्हा आणि आजही धर्म म्हणून ओळखले जातात.

बौद्ध तत्वज्ञान या धर्म-संकल्पनेहुन वेगळे असल्यामुळेच श्रद्धाळु सामान्य लोकांच्या पचनी पडणे कांहीसे दुरापास्त होते. परिणामतः बौद्ध तत्वज्ञान राजाश्रय असल्या शिवाय किंवा जनमानसात योग्य प्रकारे आत्मसात झाल्या खेरीज समाजात प्रसारीत होत नाही. सुरवातीच्या काळात जेंव्हा इथल्या वैदिक संस्कृतीने कर्मकांडांचा अतिरेक केला होता तेंव्हा भगवान महावीर आणि तथागत बुद्धांच्या तत्वज्ञानाने सामान्य जनांच्या मनाची व्यवस्थित पकड घेतली. नजीकच्या भविष्यात बुद्ध तत्वज्ञानाला मिळालेल्या राजाश्रया मुळे बुद्ध तत्वज्ञान सर्वाधिक लोकांत पसरले. सम्राट चंद्रगुप्ताने जशी मौर्य राजघराण्याची मुहुर्तमेढ रोवली तशीच जीवनाच्या उत्तरार्धात जैन तत्वज्ञानाचा अंगीकार केला. त्यांच्या मुलाने म्हणजे सम्राट बिंदुसाराने आजीवक तत्वज्ञानाचे समर्थन केले.

सम्राट बिंदुसारा नंतर त्यांचा दुसरा मुलगा अशोक याने राज्य कारभार स्वतःच्या ताब्यात घेतला. त्याच्या कारकिर्दीच्या सुरवाती पासुनच बौद्ध विचारधारेला राजाश्रय दिला. सम्राट अशोकाच्या वंशातील शेवटचा राजा बृहद्रथ याचा त्याचाच ब्राम्हण सेनापती पुष्यमित्र शुंग याने वध केला आणि त्यानंतर अखंड जंबुद्वीपाची शकले झाली. बौद्ध तत्वज्ञानाचा राजाश्रय कमी कमी होत गेला. गुप्त वंशाच्या कारकिर्दीत बौद्ध तत्वज्ञानाचा पुरस्कार करणारे पुरेसे लोक या उपखंडात रहात होते. त्या नंतर सम्राट हर्षवर्धनाच्या काळापर्यंत बौद्ध तत्वज्ञान या उपखंडात तग धरुन होते. इसवीसनाच्या सुरवाती पासून इसवीसनाच्या सातव्या शतका पर्यंत बौद्ध तत्वज्ञानाला बरे वाईट दिवस येत गेले पण यानंतर मात्र बौद्ध तत्वज्ञान या उपखंडातून हद्दपार होत गेले. मोगल राजवटीत आणि त्यानंतर भारतात बौद्ध तत्वज्ञान नाहिसे झाले, किंवा फक्त नावापुरतेच शिल्लक राहिले. याला अनेक कारणे आहेत पण त्या कारणांचा मागोवा घेणे येथे विषयांतराचे होईल. एकोणीसशे चोपन्न मधे ब्रम्हदेशात संपन्न झालेल्या जागतिक बौद्ध परिषदेस भारतातील जे नगण्य भिक्षुगण

उपस्थित होते त्यांच्याकडे भारतीय लिपीत छापलेली तिपीटकाची प्रत उपलब्ध नव्हती. या परिषदेस डॉ. बाबासाहेब अंबेडकर सन्मान्य अतिथी म्हणून उपस्थित होते. कारण एकोणीसशे पस्तिस मधेच डॉ. बाबासाहेबांनी हिंदु धर्माचा त्याग करण्याची घोषणा केली होती आणि ते जगातील प्रमुख धर्मांचा अभ्यास करीत होते.


बौद्ध तत्वज्ञानाचा भारता पुरता इतका ऱ्हास झालेला असतांना डॉ. बाबासाहेब अंबेडकरांना हे तत्वज्ञान अभ्यास करण्यासाठी भारतात उपलब्ध असणे कठीणच. तरीही हे तत्वज्ञान जगातल्या अनेक देशात सुस्थितीत जतन केले गेले होते. हे देश होते श्रीलंका, ब्रम्हदेश, चीन आणि त्यांचे निकटवर्तीय इतर लहान देश. या देशांत या तत्वज्ञानाचे जतन होण्याला एकमेव कारण म्हणजे सम्राट अशोक. सम्राट अशोकांनीच या देशात बौद्ध धम्मदूत पाठवून या तत्वज्ञानाचा प्रसार केला होता. यातील अनेक देशांत आणि भारतातही एकोणीसाव्या शतकात ब्रिटीशांची सत्ता होती. ब्रिटीशांनी या देशाच्या इतिहासाचा आणि परंपरांचा अभ्यास केला. आणि जगभरातील ज्ञानपिपासु लोकांना हा अभ्यास उपलब्ध करुन दिला. जेंव्हा भारतात स्वतःच्या भाषेत, स्वतःच्या लिपीत तिपीटकाची प्रत उपलब्ध नव्हती, तेंव्हा इंग्लंड मधे पालि टेक्स्ट सोसायटी कार्यरत होती आणि तिचे संस्थापक निर्माते सर टी.डब्लु.ऱ्हईस डेव्हीड यांनी तिपीटकातील अनेक प्रकरणांचा इंग्लिश भाषेत अनुवाद केलेला उपलब्ध होता. भारतातील एक ब्रिटीश अधिकारी सर ॲलेक्झांडर कनिंगहॅम आणि सर जॉन मार्शल यांनी आज भारतात प्रसिद्ध असलेल्या बौद्ध ऐतिहासिक स्थळांचे आणि सम्राट अशोकाच्या स्तंभांचे व शिलालेखांचे पुनरुज्जीवन केले होते. म्हणून आज आपण भारतीय बौद्ध, डॉ. बाबासाहांचे अनुयायी, बौद्ध तत्वज्ञान आत्मसात करण्याच्या मार्गावर वाटचाल करु शकलो.

ब्रिटीश इतिहास-तज्ञांना सर्वाधिक भुरळ पाडणारा पण भारतीयांनी मात्र इतिहासातून पुसून टाकलेला, तरीही त्याच्या स्वतःच्याच कर्तृत्वाने शिलालेखांतून आणि स्तंभलेखांतून पुन्हा प्रकट झालेला, सर्वदूर बौद्ध तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करणारा, तरीही स्वतःची सर्व संप्रदाय समन्वयक अशी प्रतिमा तयार करणारा, या उपखंडातला एकमेव महासम्राट म्हणजे सम्राट अशोक.

सम्राट अशोक हे नाव कानावर पडताच या संपुर्ण उपखंडाला एकसुत्र करणारा पहिला-वहिला सम्राट नजरेसमोर येतो. अफगाणिस्तान पासुन आंन्ध्र-कर्नाटक पर्यंत, गुजराथ पासुन आसाम पर्यंत एकच एक राजवट, आणि राजा सम्राट अशोक. एवढे मोठे साम्राज्य म्हणजे समाजात अनेक मतप्रवाह असणे स्वाभाविक आहे. सम्राट अशोकाच्या साम्राज्यात ब्राम्हणी तत्वज्ञान, आजीवक तत्वज्ञान, लोकायत तत्वज्ञान, जैन तत्वज्ञान, बौद्ध तत्वज्ञान अशा मतप्रवाहाचे लोक समाजात गुण्यागोविंदाने रहात होते. कलिंग युद्धात झालेली जीवीतहानी पाहुन व्यथित होऊन सम्राट अशोक बौद्ध तत्वज्ञानाकडे आकृष्ट झाला असे अनेक लोक सांगत असले तरी सम्राट अशोकांच्या मनावर तरुणपणापासुनच बौद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव होता हे आवर्जून सांगणे मला अधिक महत्वाचे वाटते. भारताच्या इतिहासाचे सखोल अभ्यासक, ब्रिटीश माता-पित्यांच्या पोटी भारतातील कानपुर शहरात १९४० साली जन्मलेले चार्लस ॲलन यांनी सम्राट अशोकाचा सखोल अभ्यास करुन तरुण अशोकाच्या मनावर बौद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव होता, या सत्यावर भारतीय तथाकथीत विद्वानांनी टाकलेला पडदा सप्रमाण दूर केला आहे. या सत्याचे प्रमाण म्हणून चार्लस ॲलन यांनी मध्यप्रदेशातील पांगुरारीया (प्रत्यक्षात नक्तितालाई) या खेड्याजवळ इसवी.सन १९७१ मधे सापडलेल्या सम्राट अशोकाच्या शिलालेखाचा दाखला दिला आहे.

सम्राट अशोक युवराज असताना उजैन प्रांताचा प्रमुख होता. उजैन पासुन सुमारे सव्वाशे कि.मी.वर विदिशा हे ठिकाण आहे. विदिशा नगरीतील व्यापाऱ्याची कन्या "देवी विदिशा" हिच्याशी त्याचे अनुबंध जुळले होते. याचा लिखीत पुरावा भोपाळपासुन कांही अंतरावरील होशिंगाबाद शहरापासुन जवळच असलेल्या एका लहान खेड्याजवळ सापडलेल्या सम्राट अशोकाच्या शिलालेखाच्या वरच्या भागात दिसतो. विदिशा पासुन सुमारे सव्वाशे कि.मी. अंतरावर सलकनपुर हा डोंगराळ प्रदेश आहे. या सलकनपुर गावाजवळच नक्तितालाई हे अगदीच लहान खेडे आहे. या खेड्या जवळ डोंगरांच्या उतारावर (या भागाला सारु-मारु अशा नावाने देखील ओळखले जाते.) हा शिलालेख आहे. हा शिलालेख मी १० फेब्रुवारी २०१९ रोजी प्रत्यक्ष पाहिला. नक्तितालाई हे खेडे खुपच लहान असुन ते पांगुरारीया या गावाच्या अंतर्गत येत असल्यामुळे या शिलालेखाला पांगुरारिया शिलालेख म्हणतात.

पुढील चित्रात पांगुरारीया शिलालेखाच्या वरच्या भागात असलेल्या लहान लेखाचे रेखाचित्र दिसत आहे. या लेखाचे देवनागरी लिप्यांतर खालील प्रमाणे आहे.



पियदसि नाम
राजकुमार व
संवसमाने
(इ)मं देस पपुनिथ
विहारयाताये

या शिलालेखाला तत्कालिन अभ्यासकांनी मुळ शिलालेखाची प्रस्तावना म्हटले आहे. परंतु या शिलालेखाचे व्यवस्थित निरीक्षण केल्यास असे जाणवते की, मुख्य शिलालेखाच्या वर सुमारे अडीच मीटर उंचीवर पाच ओळीत केवळ आठ शब्दांचा हा लेख विशेष आहे. यातील अक्षरे आकाराने मोठी परंतु ओबड-धोबड आहेत. यावरुन हा लेख सम्राट

अशोकाच्या लेखनीकाने लिहीलेला नसावा परंतु जवळपास रहाणाऱ्या दुसऱ्याच कोणीतरी थोडा उशीरा परंतु त्याच काळात लिहीला असावा. लेखाच्या आशया वरुन याच संकल्पनेला पुष्टी मिळते. या शिलालेखाचा प्रथम अनुवाद तत्कालीन भारतीय पुरातत्वज्ञ आणि इतिहासकार दिनेशचंद्र सरकार यांनी केला तो पुढील प्रमाणे –

The King named Piyadarsin (speaks) to Kumar Samva from (his) march (of pilgrimage) to Upanitha-Vihara (or Opunitha-Vihara) in Manema Desa.

याच लेखाचा इंग्लिश अनुवाद जर्मनी मधील बर्लिन शहरातील विद्यापीठात कार्यरत असलेले भारतीय इतिहास तज्ञ प्रोफेसर हॅरी फाल्क यांनी खालिल प्रमाणे केला आहे.

The King who is called Piyadassi, (once) came to this place on pleasure tour while he was still a prince, living together with his (unwedded) consort.

चार्लस ॲलन यांना अशोकाचा राजकुमार संव, उपनिथ विहार आणि मनेमा देश या डि.सी. सरकार यांनी मांडलेल्या संकल्पना कपोल-कल्पित वाटतात. कारण सम्राट अशोकाला संव नावाचा राजकुमार होता असा कोणताही उल्लेख आजवर संशोधित केलेल्या इतिहासात नाही. शिवाय उपनिथ विहार आणि मनेमा देश असे कोणतेही स्थान कोणाही इतिहासकाराला आजवर सापडलेले नाही. म्हणूनच मी या वाक्याचा मराठी अनुवाद * केला आहे तो असा ...

**प्रियदर्शी नावाचा युवराज मैत्रीणी सोबत या प्रदेशात सहलीला आला होता.**

---


संवस - सोबती, पापुणति - पोहचतो, विहारो - मनरंजन, याति - जातो, यात्रा करतो.

---

देवी विदिशा ही बौद्ध तत्वज्ञान मानणाऱ्या कुटुंबात जन्मलेली असल्याने स्वतः देखील बौद्ध विचार मानणारी होती. पुढे या तरुणीशी अशोकाने

विवाह केला आणि अशोकाचा पुत्र महेन्द्र आणि कन्या संघमित्रा यांना जन्म दिला. महेन्द्र आणि संघमित्रा हे दोघेही तथागताच्या संघात प्रवेश करुन बौद्ध तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी श्रीलंकेला गेले. उजैन प्रांताचा प्रमुख असलेला, सम्राट बिंदुसाराचा राजपुत्र अशोक, उजैन पासून सव्वाशे कि.मी. अंतरावरील विदीशा नगरीत रहाणाऱ्या मैत्रीणी सोबत, केवळ ती बौद्ध तत्वज्ञान मानते म्हणून, पुन्हा पुढे सव्वाशे कि.मी. अंतरावरील डोंगरात रहाणाऱ्या बौद्ध भन्तेंना भेटण्यास जातो, ही गोष्ट सहजपणे दुर्लक्षीत करण्याजोगी निश्चितच नाही. त्याच काळात तरुण अशोकाची बौद्ध तत्वज्ञानावर श्रद्धा असल्याशिवाय असे होणे शक्य नाही. सम्राट अशोकांची बौद्ध तत्वज्ञानावर किती श्रद्धा होती हे त्यांच्या मध्य प्रदेशातील रुपनाथ, गुजर्रा येथील आणि कर्नाटकातील सर्वच लघु शिलालेखांतून स्पष्ट होते. उदाहरणास्तव कर्नाटकातील ब्रम्हगिरी येथिल शिलालेख पुढे दिला आहे.

**ब्रम्हगिरी लघु शिलालेख** **मुळ ब्राम्हि शिलालेख**



या ब्राम्हि लेखाच्या अखेरच्या ओळीत शिला-लेखनिकाने आपले नाव (चापड) कोरले असुन त्याला खारोष्टी लिपी येते हे दाखविण्यासाठी अखेरचा शब्द 'लिपिकरेन' खारोष्टी लिपीत उजवीकडून डावीकडे लिहीला आहे.

## प्राकृत शब्द-वाक्य

सुवणंगिरीते अयपुतस महामाताणं च वचनेन इसिलसि महामाता आरोगियं वतविया हेवं च वतविया. देवानंपिये आणापयति. अधिकानि अढातियानि वसानि य हकं (उ)पासके नो तु खो बाढं पकंते हुसं. एकं सवछरं सातिरेके तु खो संवछरं. यं मया संघे उपयीते बाढं च मे पकंते. इमिना चु कालेन अमिसा समाना मुनिसा जंबुदीपसि मिसा देवेहि. पकमस हि इयं फले. नो हीयं सक्ये महात्पेनेव पापोतवे कामं तु खो खुदकेन पि पकमिटणेण विपुले स्वगे सक्ये आराधेतवे. एतायठाय इयं सावणे सावापिते. (यथा खुदकाच) महात्पा च इयं पकमे(यु) ति. अंता च मे जानेयु चिरठितीके च इयं (पकमे होतु.) इयं च अठे वढिसिति विपुलं पि च वढिसिति अवरधिया दियढियं (वढि)सत. इयं च सावणे सावपते व्यूथेन २०० ५० ६. से हेवं देवाणंपिये आह. मातापितिसु सुसूसातविये हेमेव गरुत. पाणेसु द्रफ्हितव्यं. सचं वतवियं. से इमे धंमगुणा पवतितविया हेमेव अंतेवासिना आचरिये अपचायितविये ञातिकेसु च कं य(था) रहं पवतितविये. एसा पोराणा पंकिती दिघावुसे च एस हेवं एस कटविये. चपडेन लिखितं लिपिकरेन.


## मराठी भाषांतर

आर्यपुत्राचे (सम्राटाचे) नावे, सुवर्णगिरीच्या महामात्रांना आणि इसिलसिच्या महामात्रांना आरोग्य चिंतून असे सांगावे की, देवानंप्रियांनी आज्ञापिले आहे. अडीच वर्षांहून अधिक मी उपासक होतो पण विकास नव्हता. या वर्षांहून अतिरिक्त एक वर्षापासुन संघाच्या सानिध्यात अधिक विकास आहे. या काळात जंबुद्वीपा मधे श्रमण आणि मानवांत देव

मिसळत नव्हते, आता मिसळत आहेत. हे पराक्रमाचे फळ आहे. हे केवळ महान लोकांनाच शक्य होते असे नव्हे तर विपुल पराक्रमाने सामान्य लोकांनाही स्वर्गात आरोहण शक्य आहे. यासाठीच हे सांगीतले आहे. सर्व लहान व थोरानी असा पराक्रम करावा. सीमेवरील लोकांनीही हे जाणून घ्यावे. असा पराक्रम चिरंतन व्हावा. यामुळे विकास वाढेल, विपुल वाढेल, अवरोधाविना दिवसेंदिवस वाढत राहील. २५६ काळ दूर रहातांना ही घोषणा केली आहे. देवानंप्रिय असे सांगतात. माता-पित्यांशी आज्ञाधारक असावे, तसेच गुरुजनांशीही (आज्ञाधारक असावे). प्राणिमात्रांशी दयाशील असावे, सत्य बोलावे. हे सद्धर्माचे गुण आहेत. असेच शिष्यांनी आचार्यांशी आचरावे. नातेवाईकांशी असेच आचरावे. पुर्वजांनीही असे सांगीतले आहे, यामुळे दीर्घायुष्य लाभते, म्हणून असे वागावे. चापड (या) लिपीकाराने लिहीले.

या लेखांतुन सम्राट अशोकाची बौद्ध तत्वज्ञानावरची श्रद्धा दिसत असली तरी ही श्रद्धा, केवळ श्रद्धा नव्हती. सम्राट अशोकांनी बौद्ध तत्वज्ञानाचा अभ्यास केला होता. तिपीटकातील अनेक ग्रंथ अभ्यासले होते. म्हणूनच राजस्थानातील आजच्या विराट नगर या शहराजवळ सापडलेल्या बैराट (भाब्रु) येथील शिलालेखात सम्राट अशोक तिपीटकातील व पालि साहित्यातील संदर्भ लिहीतात. पुढील लेखनातून आपण याच शिलालेखाचे स्वरुप आणि त्याचा अनुवाद पहाणार आहेत.

## बैराट (भाब्रु) लघु-शिलालेख मुळ ब्राम्हि शिलालेख




## प्राकृत भाषेतील सार्थ वाक्ये

पियदसि लाजा मागधे संघं अभिवादेमानं आहा अपाबाधंतं च फासुविहालतं च. विदिते वे भंते आवंतके हामा बुधसि धंमसि संघसी ति गलवे चं पसादे च. ए केंचि भंते भगवता बुधेन भासिता सवे से सुभासिते वा. ए चु खो भंते हमियाये दिसेयां. हेवं सधंमे चिलठितीके हासती ति अलहामि हकं त वितवे इमानि भंते धंमपलियायानि विनयसमुकसे अलियवसाणि अनागतभयानि मुनिगाथा मोनेयसूते उपतिसपसिने ए चा लाघुलो वादे मुसावादं अधिगिच्य भगवता बुधेन भासिते एतान भंते धंमपलियायानि इछामि. किंति बहुके भिखुपाये चा भिखुनिये चा अभिखिनं सुनय चा उपधालेयेयु चा. हेवंमेवा उपासका चा उपासिका चा एतेनि भंते इमं लिखापयामि अभिपेतं म जानंतति.

## मराठी भाषांतर

प्रियदर्शी, मगधचा राजा संघास अभिवादन करून (आपणास) अल्प-बाधित (कमी त्रासदायी) आणि सुखद विहाराची (इच्छा) व्यक्त करतात. आपण जाणता की मला बुद्ध, धम्म व संघा प्रति इतका गौरव आणि

श्रद्धा आहे. हे भन्ते ! भगवान बुद्धांनी जे कांही सांगीतले ती सर्व सुभाषिते आहेत. परंतु हे भन्ते ! जसे मला दिसते (समजते) आहे, हा सद्धम्म चिरस्थापित होइल. मला हे वर्तविणे योग्य वाटते कि, अहो भंते ! हा धम्माचा पर्याय आहे की, विनय-समुत्कर्ष, आर्य-परंपरा (सुजनांचे कर्तव्य), अनागत-भय, मुनीगाथा, मोनेयसुत्त, उपतिस्स-प्रश्ण (सारिपुत्त-प्रश्ण), राहुल-वाद आणि मुसावाद या संदर्भात भगवान बुद्धांनी जे सांगीतले आहे. म्हणून हे भन्ते ! मी असे इच्छितो की, हा धम्म-पर्याय बहुतेक (सर्व) भिक्षु व भिक्षुणीं नी हर-क्षणी ऐकावा आणि धारण करावा. आणि उपासक व उपासिकांनी सुद्धा. हे भन्ते ! यास्तव हे लिहवितो की, माझा अभिप्राय (हेतु) जाणावा.

बैराट (भाब्रु) या शिलालेखात सम्राट अशोक तिपीटकातील पालि साहित्याचे संदर्भ देतात. यावरुन सम्राट अशोकांनी या साहित्याचा अभ्यास केला होता हे निश्चित सिद्ध होते. सम्राट अशोकाच्या काळात प्राकृत साहित्य लिपीबद्ध करुन ठेवले होते अथवा नाही याचा आजवर तरी कांही पुरावा मिळालेला नाही. शिवाय अशा लिखाणाच्या प्रति असतीलच तर त्यांच्या संख्या देखील मर्यादितच असतील. म्हणजे असा अभ्यास करणे तेंव्हाच शक्य झाले असेल जेंव्हा राजा अशोक संघाच्या अथवा त्यावेळी अस्तित्वात असणाऱ्या विद्यापीठाच्या सानिध्यात राहिले असतील. सम्राट अशोक संघाच्या सानिध्यात राहिले होते याचा पुरावा लघु शिलालेखात आलाच आहे.

सम्राट अशोकांवर पालि बौद्ध साहित्याचा प्रभाव कधी आणि कसा झाला हे त्यानी लिहविलेल्या शिलालेख आणि स्तंभलेखांवरुन समजु शकते. सम्राट अशोकांच्या शिलालेखांचा अभ्यास करताना या शिलालेखांचा कालक्रम नीट अभ्यास करायला हवा. त्यासाठी शिलालेखातील ब्राम्हि अक्षरांचे आणि शिलालेख संरचनेचे निरीक्षण करायला हवे.

सम्राट अशोकाबद्दल उपलब्ध असलेल्या अनेक इतिहासकारांच्या लेखनातून असे समजले आहे की अशोकाने स्वतःला जंबुद्वीपाचा राजा घोषीत केल्यानंतर सुमारे चार वर्षांनी राज्याभिषेक करवून घेतला. राज्याभिषेका नंतर आठ वर्षांनी त्याने कलिंग जिंकले असे बृहद्-शिलालेखातील तेराव्या शिलालेखात वाचावयास मिळते. अभिषेकानंतर बारा वर्षांनी बृहद्-शिलालेख शृंखला लिहविली असे या शृंखलेतील चौथ्या लेखात वाचावयास मिळते. स्तंभलेख शृंखलेतील सहाव्या लेखात स्वतः अशोकानेच उल्लेख केला आहे की, “अभिषेकानंतर बारा वर्षांनी मी नीती(धम्म)लेख लिहविले”. तसेच स्तंभलेख शृंखला अभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी लिहील्याचे पहिल्या, चौथ्या आणि सहाव्या स्तंभलेखात वाचावयास मिळते. बृहद् शिलालेख आणि लघु शिलालेख यांतील अक्षरांचे आकार व रचना यांचे निरीक्षण केल्यावर असे निश्चित जाणवते की लघु शिलालेख हे बृहद् शिलालेखांच्या कांही काळापुर्वी लिहविले असावेत. धौलि आणि जौगड (अशोक कालीन कलिंग) मधे बृहद् शिलालेख शृंखला आहे पण त्यात या शृंखलेतील ११, १२ व १३ क्रमांकाचे शिलालेख नाहीत. त्या ऐवजी दोन स्वतंत्र शिलालेख आहेत. यातील दुसऱ्या स्वतंत्र शिलालेखाच्या अखेरीस सम्राट अशोक असे म्हणतात की, मी ज्या धम्माला नमितो त्या धम्माच्या मार्गावर चालण्याने तुमचे सर्वतोपरी कल्याण होईल. हे लेख फक्त कलिंग मधेच आहेत म्हणजेच हा उपदेश सम्राटांनी यद्धोपरांत कलिंगच्या जनतेला केला आहे. सम्राट अशोक नमित असलेला धम्म म्हणजे दुसरे तिसरे कांही नसून बुद्ध तत्वज्ञान आहे. यावरुन हेच समजते की सम्राट अशोक युद्धापुर्वी बौद्ध तत्वज्ञान मानीत होते व कदाचित हे कलिंग मधील जनतेसाठी नवे होते.

तसेच लघुशिलालेखात असा प्रमुख आशय येतो की हे शिलालेख लिहीण्यापुर्वी सुमारे अडिच वर्ष सम्राट अशोक बौद्ध तत्वज्ञानाच्या समीप होते आणि त्या नंतर एका वर्षाहून अधिक काळ बौद्ध भिक्षु संघाच्या

समीप होते. म्हणजेच लघु शिलालेख लिहीण्यापुर्वी सुमारे चार वर्षाचा कालावधी सम्राट अशोक बौद्ध विचारधारेच्या संपर्कात होते. या लघु शिलालेखाच्या काळातच किंवा पुढील नजीकच्या काळात बैराट शिलालेखही लिहीला गेला असावा असे त्या शिलालेखातील अक्षरांच्या संरचने वरुन वाटते. हे शिलालेख बृहद् शिलालेखांच्या आधी, म्हणजेच अभिषेकानंतर बारा वर्ष लोटण्या पुर्वी लिहीले गेले असे मानले तर त्या आधी चार वर्ष सम्राट अशोक बौद्ध विचारधारेच्या संपर्कात होते. म्हणजेच अभिषेका नंतर आठ वर्ष लोटण्यापुर्वी सम्राट अशोक बौद्ध विचारधारेच्या संपर्कात होते. याच काळात बैराट शिलालेख लिहीला गेला असेल तर या कळात सम्राट अशोकांनी बौद्ध पालि साहित्याचा अभ्यास केलेला होता हे सप्रमाण समजते. म्हणूनच त्यांनी या शिलालेखात या साहित्याचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. या काळात जेंव्हा लेखन कला म्हणजेच लिपीचा नुकताच उदय झाला होता, एका सम्राटाने आपल्या राजकिय जबाबदाऱ्या पार पाडीत असतानाच असा अभ्यास करणे हे अल्पावधीत साधण्यासारखे नव्हतेच. म्हणजेच सम्राट अशोक अभिषेकानंतरची आठ वर्ष लोटण्यापुर्वीच बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत होते. सम्राट अशोकांनी कलिंग-विजय अभिषेकानंतर आठ वर्षांनी मिळविला असे त्यांच्या तेराव्या बृहद् शिलालेखात सांगीतले आहेच. नक्तितालाई (पांगुरारिया) येथे आजही अस्तित्वात असलेल्या नैसर्गीक गुहा, हे त्याकाळी बौद्ध भिक्खु संघाच्या निवासाचे स्थान होते हे अनेक पुराव्यांनी सिद्ध झाले आहे. या ठिकाणी युवराजाने निवास करणे व तोही एका बौद्ध परंपरेला मानणाऱ्या युवतीच्या सोबतीत, ही गोष्ट अनुल्लेखनीय निश्चीतच नाही. पांगुरारिया शिलालेखातील युवराज अशोक व त्यांच्या वाग्दत्त वधुच्या उल्लेखा वरुन युवराज अशोकाला बौद्ध विचाराधारेची ओळख अथवा आसक्ति तारुण्यातच होती असे म्हणणे संयुक्तिकच होईल.

एकदा अशोकाची श्रद्धा तरुणपणीच बौद्ध तत्वज्ञानावार होती असे मानले की एक नवा प्रश्न उभा रहातो. कलिंग युद्धातील जीवीतहानी पाहून अशोकाला उपरती झाली आणि त्याने अहिंसा तत्व सांगणाऱ्या बुद्धानुयायांचा मार्ग अनुसरला, असे सांगणाऱ्या इतिहासकारांनी अशोकाची दोन रुपे सांगीतली आहेत. एक चंडाशोक आणि दुसरा धम्माशोक. या मागील सत्य काय ?

बिंदुसाराच्या मृत्युनंतर साम्राज्याची गादी संपादन करण्यासाठी अशोकाने त्याच्या ९९ भावांचा वध केला अशी अख्यायिका श्रीलंकेतल्या पालि साहित्यात आहे.

तथागतांच्या परिनिर्वाणा नंतर कांही शतकातच बुद्धानुयायांत दुफळी होत गेली. बुद्धांची शिकवण मुळ शुद्ध स्वरुपात जतन करणारे, त्यापेक्षा वेगळ्या कोणत्याही विचाराला थारा न देणारे लोक एका बाजूला तर दुसऱ्या बाजुला सर्व प्रकारच्या विचारांना समावुन घेत, त्यांच्या संकल्पनांना देखील बुद्ध संकल्पनांमधे घोळवून अधिकाधिक लोकांना आपल्या कडे आकृष्ट करुन घेणारे लोक. या बौद्ध संप्रदायाने नव्याने कांही साहित्य निर्मीती केली. नव्याने बुद्धानुयायी होणाराची पुर्व प्रतिमा अतिरेकाने मलिन करुन बुद्धानुयायी होताच तो कसा सर्वोत्तम झाला याचे वर्णन करणरे साहित्य विपुल प्रमाणात निर्माण झाले. तथागतांच्या मुळ तत्वज्ञाना ऐवजी तथागतांच्या स्तुतीला आणि अशा स्तोत्रांना अधिक मोल प्राप्त झाले. अंगुलीमालाची कथा आणि जयमंगलअठ्ठगाथेत संदर्भ असलेल्या इतर कथा हेच दर्शवितात.

बौद्ध तत्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या राजा अशोकांची लोकप्रियता वाढीस लागताच त्यांच्या भोवती देखील अशाच कथांचे वलय उभारले गेले. ९९ भावांचा वध, कलिंग युद्ध आणि त्यातुन आलेल्या विषण्णते नंतर बुद्धाचे अनुसरण या संकल्पनेमुळे अशोकाची नंतरची प्रतिमा अधिक झळाळुन गेलेली भासते. तिबेट मधील सोळाव्या शतकातील एक

बौद्ध विद्वान, भन्ते तारानाथ मात्र ९९ भावांच्या वधाच्या कथेला कपोलकल्पित ठरवितात. अशोकाला फक्त सहा भाऊ होते असे ते सांगतात.

सम्राट अशोकाच्या धौलि येथील शिलालेखात तोसली प्रांताच्या महामात्रा बरोबर तोसलीचे कुमार असा उल्लेख येतो. तोसली प्रांताचे प्रमुख राजघराण्यातील राजकुमार असावेत असे दिसून येते. ब्रम्हगिरीच्या शिलालेखात इसिलसि च्या महामात्रांसोबतच आर्यपुत्र असाही उल्लेख येतो. येथे देखील इसिलसि चे प्रांताधिकारी राजघराण्यातील व्यक्ति असण्याचे संकेत मिळतात. ब्रम्हगिरी शिलालेखांपासुन सुमारे दोन ते तीन किलोमीटर अंतरावर मौर्यकालीन दफनभुमी सापडली असुन ही मौर्य साम्राज्यातील राजघराण्याशी संबंधित असावी असे संकेत मिळाले आहेत. अशोकाने आपल्या सर्व भावांचा वध केला असेल तर राजघराण्यातील राजकुमार असणारे हे प्रांताधिकारी कोण ?

राजकुमार अशोक उजैन प्रांताचा प्रांताधिकारी असतांना, त्याचा मोठा सावत्र भाऊ, राजकुमार सुशीम तक्षशीला प्रांताचा प्रांताधिकारी होता. त्यावेळी तक्षशीलेत मंत्रिगण आणि सैन्याने मिळून बंड केले. राजकुमार सुशीम हे बंड मोडून काढण्यात यशस्वी होऊ शकला नाही. म्हणून उजैनहुन अशोकाला पाचारण करुन त्याला तक्षशीलेस पाठविण्यात आले. अशोकाने ते बंड युद्ध न करताच केवळ विचार विनीमयाने संपविले. अशोक क्रोधीत विचारांचा, चंड स्वभावाचा असता तर हे कितपत शक्य झाले असते ?


अशोकाची राजधानी पाटलीपुत्रात एक छळछावणी असल्याचा उल्लेख कांही साहित्यात येतो. अशोकाच्या शिलालेखातून त्याचे प्रजाजनां विषयीचे जे विचार प्रकट होतात त्यातून तो अजोबा चंद्रगुप्ताचे गुरुवर्य चाणाक्य यांच्या शिकवणुकी प्रमाणे राज्यकारभार करीत असावा असे प्रकर्षाने जाणवते. चाणाक्य गुन्हेगारांना शिक्षा देताना दयेची वागणूक

देण्याच्या बाजूने कधीही नव्हते. मृत्युदंडाची शिक्षा झालेल्यांना शिक्षा झाल्याच्या दिवसापासून शिक्षेची अंमलबजावणी होईतो ज्या तुरुंगात ठेवले जात असेल त्या तुरुंगाचे वर्णन छळछावणी असे केले गेले असावे. अशोकाच्या स्तंभलेखातील चौथ्या लेखात मृत्युदंड झालेल्या कैद्याशी कसा व्यवहार असावा याची एक झलक दिसते. यात त्याच्यातील क्रुरतेचा लवलेशही दिसत नाही. यावरुन छळछावणी ही देखील एक कपोल कल्पित संकल्पना सम्राट अशोकाच्या चरित्र्यात अशाच अतिरेकी स्तुती करण्याच्या अविष्काराच्या प्रकाराने आली असावी.

या गोष्टींचा सारासार विचार केल्यास सम्राट अशोक मुलतःच बौद्ध विचारधारा मानणारे आणि त्याप्रमाणेच आचरण करणारे असावेत असे निश्चितच वाटते. सम्राट अशोक केवळ बौद्ध-धम्म-आचरण करीत नव्हते तर स्वतःला आलेल्या अनुभवांच्या आधारे त्यांच्या प्रजाजनांना आणि सीमेपल्याडच्या सामान्य जनांना देखील बौद्ध तत्वज्ञानाचा उपदेश शिलालेखांतून आणि स्तंभलेखांतून करीत होते. सम्राट अशोकांचे शिलालेख आणि स्तंभलेख हे सम्राट अशोकांचा इतिहास सांगणारे सर्वाधिक सबळ पुरावे आहेत.

सम्राट अशोकांनी आपल्या जीवनाचा अधिकाधिक काळ बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यात घालविला असला तरीही त्यांनी त्याकाळी अस्तित्वात असणाऱ्या सर्व तत्वज्ञानांचा योग्य प्रकारे आदर केला होता. त्यांच्या बाराव्या बृहद् शिलालेखात याचा सबळ पुरावा मिळतो.

**गिरनार शिला लेख – १२ मुळ ब्राम्हि शिलालेख**



## प्राकृत भाषेतील सार्थ वाक्ये

देवानंपिये पियदसि राजा सवपासंडानि च प्रवजितानि च घरस्तानि च पूजयति दानेन च विविधाय च पूजाय पूजयति ने. न तु तथा दानं व पूजा व देवानंपियो मंञते यथा किति सारवढी अस सवपासंडानं. सारावढी तु बहुविधा. तस तस तु इदं मूलं य वचिगुती किति आत्पपासंडपूजा व परापासंडगरहा व नो भवे अपकरणम्हि लहका व अस तम्हि तम्हि प्रकरणे. पूजेतया तु एव परापासंडा तेन तेन प्रकरणेन. एवं कतं आत्पपासंड च वढयति परपासंडस च उपकारोति. तदं यथा करोतो आत्पपासडं च छणती परापासंड च पि  अपकरोति याहि कोचि आत्पपासंडं पूजयति परपासंड व गरहति सव आत्पपासंडभतिया किंति आत्पपासंडं दीपयेम इति सो च पुन तथ करातो आत्पपासंडं बाढतरं उपहनाति. त समवायो एव साधु किंति मञमंञस धंमं स्रुणाज च सुसंसेर च. एव हि देवानंपियस इछा किंति सव पासंडा बहुस्रुता च असु कलाणागमा च असु. ये च तत्र तत पसंना तेहि वतव्यं. देवानंपियो नो तथा दानं व पुजा व मंञते यथा किंति सारवढी अस सवपासंडान. बहका च एताय अथा  व्यापता धंममहामता च इथीझखमहामाता च वचभूमीका च अञे च निकाया. अयं च एतास फलं य आत्पपासंडवढी च होति धंमस च दीपना.

## मराठी भाषांतर

देवांनाप्रिय प्रियदर्शी राजा दानाने व विविध पुजनाने सर्व संप्रदायातील प्रवज्जित (गृहत्यागी) आणि (सद्)गृहस्थांचा सन्मान करतात. परंतु देवांनाप्रिय किर्ती व सारवृद्धीस (जसे) मानतात  (तसे) दानास व पुजनास नव्हे. सारवृद्धी अनेक प्रकारे होते. यात मुख्य (म्हणजे) अल्पवाणी (बोलण्यावर संयम). (म्हणजे) काय ? तर विनाकारण स्वसंप्रदायाची पुजा व परसंप्रदायाची निन्दा न करावी वा अल्पशी (चर्चा) त्या त्या प्रकरणी व्हावी. वेळोवेळी परसंप्रदायाची पुजाच व्हावी. असे करणारा

स्वसंप्रदायाची वृद्धी व परसंप्रदायास उपकृत करतो. याविपरित करणारा स्वसंप्रदायाची क्षति आणि परसंप्रदायास(ही) अपकार करतो. जो कुणी स्वसंप्रदायाच्या भक्तिस्तव स्वसंप्रदायास (अधिक) प्रकाशित करण्यासाठी स्वसंप्रदायाची पुजा व परसंप्रदायाची निन्दा करतो, तो सत्यतः स्वसंप्रदायाची अधिकाधिक हानी करतो. म्हणून एकत्र असणे चांगले, एकमेकांचा धर्म (जीवन-तत्वे) ऐकणे व ऐकविणे (चांगले). देवानांप्रिय (राजा) इच्छा करतात की, सर्व संप्रदाय बहुश्रुत (विद्वान) होवोत, कल्याणगामी होवोत. त्या-त्या प्रसन्न (आपपल्या संप्रदायात प्रसन्न) जनांस सांगावे की, देवांनाप्रिय किर्ती व सारवृद्धीस (जसे) मानतात (तसे) दानास व पुजनास नव्हे. याच कारणास्तव अनेक धर्म-महामात्र, स्त्री-प्रधान-महामात्र, वज्रभुमिक आणि अन्य (अधिकारी) नियुक्त केले आहेत. याचाच परिणाम आहे की, स्वसंप्रदायाची वृद्धी आणि धम्माचे प्रकाशन होत आहे.

या शिलालेखातुन सम्राट अशोकांचा सर्व संप्रदाय समभावाचा विचार तर प्रकट होतो, जो आजच्या कळातही अत्यावश्यक वाटतो. त्याच बरोबर स्वसंप्रदायाचे अधिकाधिक प्रकाशन कसे व्हावे यावरही सम्राट अशोक उत्तम प्रकारे प्रकाश टाकतात. भारतात अधिवास असणाऱ्या बौद्धांनी या विचारांना अनुसरणे मला तरी आवश्यक वाटते.

सम्राट अशोकांनी शिलालेख लिहवीले, स्तंभ उभारले, त्या स्तंभांच्या शिरावर सुंदर शिल्प साकारले आणि पृष्ठभागावर लेख कोरले. यातुन काय जाणवते ? वैयक्तिक आणि सामाजिक सदाचारा बद्दल सम्राट अशोक अनेक वेळा सांगतात. बृहद-शिलालेखाच्या चौथ्या आणि पाचव्या शिलालेखात हेच प्रतिपादन करतात. दहाव्या आणि अकराव्या शिलालेखातही अशाच विचारांचे प्रतिपादन होते. सामाजिक सदाचाराबद्दल सम्राट अशोक पुन्हा पुन्हा आग्रही होतात, या सदाचारामुळे तुम्ही इहलोकी आणि परलोकी सुखी व्हाल असे सांगून सामान्य लोकांना सामाजिक सदाचारासाठी उद्युक्त करतात. बृहद-शिलालेखाची सांगता करणाऱ्या चौदाव्या शिलालेखात ते हेही सांगतात की मी माझे विचार

तुम्हाला सांगतांना कांही गोष्टींची पुनर्रुक्ती झाली आहे, कारण या विचारांचे महत्व अनन्यसाधारण आहे.

स्वतःच्या मनाला पटलेल्या आणि अनुभवाने सिद्ध झालेल्या तत्वांना प्रजाजनां पर्यंत पोचविण्यासाठी सम्राट अशोक कायदे करीत नाहीत, सक्ती करीत नाहीत पण प्रचार करीत रहातात, पुन्हा पुन्हा त्याच गोष्टी सांगत रहातात. आणि याच साठी ते यापुर्वी कधीही न वापरलेली पद्धत वापरून जागोजागी शिलालेख लिहवीतात. हे पहाता सम्राट अशोक हे भारतीय उपखंडातला पहिले प्रकाशक होते, किंवा साऱ्या जगातलेच आद्य प्रकाशक होते असे म्हणणे चुकीचे होणार नाही.

राज्याभिषेका नंतरची बारा वर्ष अशी गेली. या कालावधीत सम्राट अशोकांनी प्रजेच्या सुखासाठी, उत्कर्षासाठी अनेक कामे केली. रस्ते बांधले, रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली, जागो-जागी विहीरी खणल्या. बागा आणि उद्याने तयार केली. तलाव बांधले. अशाच एका तलावाची माहीती जुनागढ येथील अशोकांच्या शिलालेखाच्याच शिळेवर कोरलेल्या राजा रुद्रदमन यांच्या शिलालेखातून मिळते. मानवांसाठी आणि पशुंसाठी औषधोपचाराची व्यवस्था केली. त्यासाठीच उद्यांनातून औषधी वनस्पती लावल्या. फक्त आपल्या साम्राज्यातच नव्हे तर साम्राज्याच्या सीमेच्या पल्याडही अशा वनस्पती लावल्या. प्रजेच्या भौतिक उत्कर्षा बरोबरच अभिभौतिक उत्कर्षासाठी देखील कामे केली. तथागत बुद्धांच्या तत्वज्ञानाचा स्वतः अभ्यास केलाच शिवाय हे तत्वज्ञान अधिकाधिक लोकांपर्यंत पोचावे म्हणून विहार बांधले, स्तुप बांधले. भिक्षुसंघाला राजाश्रय दिला. बैराट शिलालेख दर्शवितो की, सम्राट अशोकांनी बुद्ध तत्वज्ञानाचा अभ्यास करुन भिक्षुसंघाला राजाश्रया बरोबरच शक्य होईल तसे बौद्धिक मार्गदर्शनही केले होते. सारनाथ स्तंभलेखात सम्राट अशोक बौद्ध भिक्षु संघ शुद्ध असावा त्यात फुट पडु नये म्हणून यथा योग्य मार्गदर्शन करतांना दिसतात.

लघु-शिलालेख आणि बृहद्-शिलालेखांचे आणि शिलास्तंभ-लेखांचे तुलनात्मक निरीक्षण केल्यास अनेक वेगळ्या गोष्टींची निश्चित जाणीव होते. शिलालेख लिहीणाऱ्या लेखनिकांपेक्षा स्तंभालेख लिहीणारे

लेखनिक अधिक रेखीव लेखन करतात. त्यांच्या अक्षरांचे आकार अधिक प्रमाणबद्ध आहेत. लेखात येणारे एकेक अक्षर जितक्या वेळा पुन्हा पुन्हा लिहीले जाते तितक्या ठिकाणी त्याचा आकार आणि प्रमाणबद्धता सारखीच दिसते. दुसरे असे की शिलालेखात सर्व अक्षरे एका पुढे एक लिहीली जातात. एक शब्द कोठे संपून दुसरा कोठे सुरवात होतो हे स्पष्ट होत नाही. लेखाच्या पहिल्या अक्षरापासून शेवटच्या अक्षरापर्यंत शिळेची कड (लेखनक्षेत्राची कड) आल्यावरच पुढील ओळीत पुढचे अक्षर लिहीले जाते. त्या ठिकाणी शब्द अथवा वाक्य अर्धवट राहिले असले तरी अक्षरे मात्र सरळ एका पुढे एक येत जातात. स्तंभलेखात मात्र दोन शब्दात अंतर ठेवलेले दिसते. ओळ संपताना शब्दाचा तुकडा पाडलेला दिसत नाही. स्तंभांचा पृष्ठभाग अधिक गुळगूळीत केलेला दिसतो. स्तंभशीर्ष म्हणून बैल, हत्ती आणि सिंहाच्या मुर्ती कोरलेल्या दिसतात. या मुर्तीतले प्राणी प्रमाणबद्ध आहेत, सुंदर आहेत. प्राण्याच्या खाली लहानसा चबुतरा आहे आणि त्यावर सुंदर प्रमाणबद्ध नक्षी कोरलेली आहे. या साऱ्यांतून काय सिद्ध होते ?

राज्याभिषेका नंतर बाराव्या वर्षानंतरची सुमारे चौदा वर्ष किंवा सर्वच्या सर्व सव्वीस वर्ष ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात खुपच विकास झाला असावा, नव्हे असा विकास सम्राटाने जाणिवपुर्वक केला असावा. लेखनशास्त्र, चित्रकला, मुर्तीकला सामान्य लोकांपर्यत निश्चितच पोचविल्या असतील. कारण केवळ लेख लिहील्याने विचारांचा प्रसार कसा होईल ? लिहीलेले लेख वाचणारा मोठा वर्ग तयार केल्या शिवाय असे शिलालेख व्यर्थ ठरतील. या लेखांचे वाचन वेळो वेळी सार्वजनिक अथवा एकेकट्याने देखील व्हावे असे धौलि आणि जौगड येथील स्वतंत्र शिलालेखात सांगीतले आहे. हाच पुरावा आहे, सम्राट अशोकाच्या राज्यात अनेक प्रजाजन साक्षर होते या सत्याचा. या बाबतीत सर व्हिंसेंट स्मिथ म्हणतात, सम्राट अशोकाने लिहविलेले शिलालेख आणि स्तंभलेख, कोणत्याही साहित्यीक भाषेत न लिहविता त्या त्या प्रांताच्या स्थानिक बोली भाषेत लिहविले, याचे कारण सामान्य प्रजाजनास ते वाचल्या नंतर सहजपणे समजावेत. आणि समान्य प्रजाजन लिहीण्या-वाचण्या योग्य

होण्यासाठी बौद्ध संघाचा उपयोग केला असावा. पुढे ते म्हणतात १९०१ साली औध प्रांताच्या ब्रिटीश जनगणनेत ५.७ % पुरुष तर केवळ ०.२% महिला साक्षर होत्या. या तुलनेत ब्रम्हदेशात ही संख्या अनुक्रमे ३७.८% आणि ४.५% इतकी होती कारण तेथे लोकशिक्षणाचे काम बौद्ध विहारांत बौद्ध संघाकडून केले जात होते. मात्र भारतात अशोकानंतर अशी लोकशिक्षण व्यवस्था कधी नव्हतीच. अशोकाच्या राज्यात कलेच्या क्षेत्रात नव्या संकल्पना रुजविल्या गेल्या. मोठ-मोठ्या स्तंभांची निर्मीती आणि त्यावर सुंदर नक्षीकाम, प्राण्यांच्या प्रमाणबद्ध मुर्ती साकारल्या गेल्या. सुंदर नक्षीकाम आणि प्रमाणबद्ध मुर्तींची निर्मीती करणे तेंव्हाच अर्थपूर्ण असेल जेंव्हा या सर्वांचा अस्वाद घेणारा रसिकवर्ग उपलब्ध असेल. उपाशी पोटी रसिकता निर्माण होत नाही, म्हणजेच अशोकाच्या राज्यात लोकांच्या दैनंदिन गरजा निश्चितच सुलभपणे साध्य होत असणार. गोरखपुर पासून २० कि.मी. दक्षीण पुर्वेला सोहगौरा या खेड्यात सापडलेला ताम्रपटावरून असा पुरावा मिळतो की  सम्राट अशोकाच्या राज्यात धान्याची कोठारे बांधलेली होती. शेजारील चित्रात हा तम्रपट दिसत आहे. अशी कोठारे राज्यात अन्न-धान्य सुबत्ता असल्या शिवाय शक्य होणार नाही.




आज सम्राट अशोकांच्या जयंतीच्या निमीत्ताने सम्राटांच्या सर्व संप्रदाय समभाव विचारांना आणि त्यांच्या बौद्ध तत्वज्ञानाच्या अभ्यासाला, प्रचार-प्रसाराच्या अनमोल कार्याला त्रिवार अभिवादन करतो.

- अशोक तपासे.

या लेखातील सम्राट अशोकाच्या शिलालेखाच्या मुळ ब्राम्हि संहिते सह मराठी अनुवाद माझ्या “पियदस्सि राजा हेवं आहा ...”  या पुस्तकातून घेतले आहेत.



पांगुरारीया शिलालेखाचे मी काढलेले छायाचित्र.



पांगुरारीया लघु-शिलालेखाचे निरीक्षण-वाचन करताना मी स्वतः.
याच लेखाच्या वर सुमारे दोन मीटर उंचीवर या लेखात उल्लेखिलेला लेख आहे.
आजवर भारतात सापडलेल्या सम्राट अशोकाच्या ३६ शिलालेखांपैकी २९ शिलालेख मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. उरलेल्या शिलालेखांपैकी किमान दोन तरी पुढील वर्षात पहाणार आहे.